सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती.

शासकीय तंत्रनिकेतन परिसर, गाडगेनगर, अमरावती.

**Ph.No** : (0721) 2573027, 2572577

**Website:** www.jdroamt.org **Email:** roamravati@dtemaharashtra.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

क्रमांक :- विकाअ/शिक्षण/२०२२/ १७९५

दिनांक :- 14 JUL 2022

प्रति,

**प्राचार्य,**
सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या पदवीका, पदवी व पदव्युत्तर पदवी संस्था,
अमरावती विभाग, अमरावती.

**विषय :- शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील तांत्रिक व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत (CAP) प्रवेशासाठी संस्थांची माहीती पडताळणी करुन अद्ययावत करण्याबाबत.**

**संदर्भ :-** या कार्यालयाचे पत्र क्रमांक :- विकाअ/शिक्षण/२०२२/१७६९ दिनांक १२ जुलै २०२२.

उपरोक्त विषयाबाबत आपणास कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मधील पदवी, पदव्युत्तर पदवी आणि पदवी अभ्यासक्रमाच्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेकरीता सहभागी संस्थांची अभ्यासक्रम व प्रवेशक्षमतेची माहीती अचूक व अद्ययावत करण्याबाबत कळविलेले आहे. तसेच पदवीका संस्थांनी दिनांक १५/७/२०२२ पर्यंत तसेच पदवी व पदव्यूत्तर पदवी अभ्यासक्रमाच्या संस्थांनी दिनांक २२/७/२०२२ पर्यंत सदर माहीती अचूक भरुन या कार्यालयात आवश्यक कागदपत्रासह उपस्थित राहुन Approved करुन घेण्याबाबत या कार्यालयाचे संदर्भिय पत्र क्रमांक १ अन्वये आपणास कळविलेले आहे.

तथापी असे निदर्शनास आले की, ब-याचश्या संस्थाकडे शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता सबंधित शिखर परीषदेची मान्यता, शासन मान्यता, त्यानुसार महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळाचे सलग्नता, फॉर्मसी कौन्सिल ऑफ इंडिया, नवी दिल्ली, तसेच सबंधित विद्यापिठाचे सलग्नता प्रमाणपत्र अजुनपर्यंत प्राप्त झालेले नसल्याबाबत कळविलेले आहे.

तेव्हा आपणास कळविण्यात येते की, वर नमुद केलेले कागदपत्रे तात्काळ प्राप्त करुन घेण्याबाबतची कार्यवाही करावी तसेच सदर कागदपत्रे आपणास कोणत्या दिनांकापर्यंत प्राप्त होईल, याबाबत या कार्यालयास दिनांक १५/७/२०२२ पर्यंत कळवावे.

**(डॉ. वि.रं. मानकर)**
प्र.सहसंचालक तंत्रशिक्षण,
अमरावती.

**प्रत :- प्रोग्रामर,** तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, अमरावती यांना संकेतस्थळार टाकण्यासाठी.